**<u>स्पे.दिवाणी दावा क्र. ६८/२०१२ मधील निशाणी १८७ वरील आदेश</u>**

(पारीत दिनांक १६/०१/२०१९)

अर्ज व म्हणणे वाचले. उभय पक्षांचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादी दिनांक ०५/०९/२०११ रोजी झालेला खरेदीपत्राचा मुळ दस्त प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांच्या कब्जात असुन तो अभिलेखावर दाखल करावा अशी मागणी केलेली आहे.

२. प्रतिवादीनी वादीची मागणी योग्य नाही, कोणत्याही कारणाशिवाय वादी अशा प्रकारचा अर्ज देऊन प्रकरण लांबवत आहेत सबब अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली. प्रतिवादी क्र. ७ व ८ यांनी सदरील दस्त प्रतिवादी क्र. ६ च्या कब्जात आहे त्यामुळे तो दस्त ते हजर करु शकत नाहीत असे कथन केले आहे.

३. वादीचा दावा पाहीला. वादीने त्याच्या दाव्यामध्ये तारीख ०५/०९/२०११ रोजीचे कथीत खरेदीपत्राचा दस्त प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांनी त्यांची फसवणुक करुन, करुन घेतलेला आहे. वादीस त्या दस्ताचा कच्चा मसुदा दाखवला, त्यास वादीने संमती दिली मात्र खरेदीपत्र तयार करतेवेळी त्यातील मसुद्यामध्ये काही पाने बदल करुन दुसरा मजकुर नमुद केला आहे असे वादीचे म्हणणे आहे. वादीच्या दाव्याचे स्वरुप व प्रतिवादी यांचा बचाव विचारात घेतला असता खरेदीपत्राचा मुळ दस्त अभिलेखावर असेल तर अंतीम न्यायनिर्णयासाठी तो उपयोगी असणार आहे. तसेच तो दस्त अभिलेखावर दाखल केल्याने वादी प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट सत्य परिस्थिती अभिलेखावर येण्यास मदत होणार आहे.

४. वादीनी प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांना त्या दस्ताच्या आधारे काही बोजे निर्माण केले आहेत किंवा कसे याबाबतची माहिती मागीतली आहे. प्रस्तुत वादातील दस्त अस्तित्वात आल्यानंतर प्रतिवादी नं. ५ ते ८ यांना मालकी हक्क प्राप्त झाल्यानंतर दरम्यानच्या कालावधीमध्ये त्यांनी काही वित्तीय संस्थाकडुन अथवा व्यक्तीकडुन त्या मिळकतीवरती कर्ज घेतले असल्यास अंतीम निर्णय वादीच्या बाजुने झाल्यास त्यात संस्थांची अथवा व्यक्तींची हुकुमनाम्याच्या अंमलबजावणीच्या वेळी हरकत उपस्थितीत होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांना त्यांनी तशा प्रकारचे दावा मिळकती तारण ठेवून बोजे अथवा कर्ज काढले असल्यास तशी माहीती अभिलेखावर दाखल केल्यास वादी अथवा प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, पुढील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. प्रतिवादी क्र. ६ अथवा प्रतिवादी क्र. ५ ते ८ पैकी ज्यांच्या कब्जात ०५/०९/२०११ रोजीचा वादातील खरेदीपत्राचा दस्त आहे त्यांनी तो मुळ दस्त अभिलेखावर हजर करावा.

२. प्रतिवादी नं. ५ ते ८ यांना असे निर्देषीत करण्यात येते की, त्यांनी दावा दाखल केल्यानंतर अथवा तत्पुर्वी सदर दस्ताआधारे काही कर्ज काढले असल्यास त्याबाबतची माहिती अभिलेखावर दाखल करावी.

सही/–

(व्ही. आर. पाटील)

दि. १६/०१/२०१९ २रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, सांगली.